**नि.फौ.ख.क्र. ३१७/२०२३**
सरकार वि. मारोती व इतर
निशाणी क्र. २६

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांची जबानी</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : दिलीप उत्तमराव अंभोरे,
वय : ५० वर्ष, कामधंदा – मजुरी,
राहणार : आसेगाव पुर्णा, ता. चांदुरबाजार, जि. अमरावती

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. कावरे यांचे तर्फे</u>**

१. मी आरोपींना ओळखत नाही. मी फिर्यादीला ओळखतो. दि. ०५.०७.२०२३ रोजी पोलीसांनी पोलीस स्टेशन मध्ये माझी एका कागदावर सही घेतली होती. त्यावेळेस त्या कागदावरील मजकुर मी वाचला नव्हता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. पंचनामा कशा संदर्भात होता हे मला माहीत नाही. पंचनाम्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही असुन त्यातील मजकुर मला माहीत नाही. पंचनाम्यावरील **सहीला नि.क्र. २७** देण्यात येते.

**(साक्षीदार अभियोगपक्षांस सहाय्य करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकिलांनी साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५.०७.२०२३ रोजी पोलीसांनी मला पुर्णानगर येथे फिर्यादीचे घरासमोर पंचनाम्याकामी बोलविले होते. पंचनामा आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी व लोखंडी सब्बलने डोक्यावर मारहाण करुन जखमी केल्या संदर्भात होता किंवा कसे याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला पंचनामा वाचुन दाखविला होता व त्यानंतर मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपींना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास श्री. ए. बी. वासनकर यांचे मार्फत</u>**

३. **नाकारला, फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष,

दि. २१.०३.२०२५

( पी. एम. चव्हाण )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(न्यायालय क्र. २) चांदूर बाजार.

**नि.फौ.ख.क्र. ३१७/२०२३**
सरकार वि. मारोती व इतर
निशाणी क्र. २४

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : देवानंद राजाराम वानखडे,
वय : ५५ वर्ष, कामधंदा – मजुरी,
राहणार : पुर्णानगर, ता. चांदुरबाजार, जि. अमरावती

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर. ए. कावरे यांचे तर्फे</u>**

१. मी आरोपी व फिर्यादीला ओळखतो. दि. ०५.०७.२०२३ रोजी मी पुर्णानगर येथे रस्त्याने जात असतांना पोलीसांनी तेथे येवुन माझी एका कागदावर सही घेतली होती. त्यावेळेस त्या कागदावरील मजकुर मी वाचला नव्हता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. पंचनामा कशा संदर्भात होता हे मला माहीत नाही. पंचनाम्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही असुन त्यातील मजकुर मला माहीत नाही. पंचनाम्यावरील **सहीला नि.क्र. २५** देण्यात येते.

**(साक्षीदार अभियोगपक्षांस सहाय्य करीत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकिलांनी साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५.०७.२०२३ रोजी पोलीसांनी मला पुर्णानगर येथे फिर्यादीचे घरासमोर पंचनाम्याकामी बोलविले होते. पंचनामा आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी व लोखंडी सब्बलने डोक्यावर मारहाण करुन जखमी केल्या संदर्भात होता किंवा कसे याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला पंचनामा वाचुन दाखविला होता व त्यानंतर मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे ओळखीचे असल्याने त्यांना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास श्री. ए. बी. वासनकर यांचे मार्फत</u>**

३. **नाकारला, फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष,

दि. २१.०३.२०२५

( पी. एम. चव्हाण )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
(न्यायालय क्र. २) चांदूर बाजार.